**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती** : प्रश्नोत्तरे ....

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, ....

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते, मी प्रश्नोत्तरे असे म्हटले आहे. परंतु तरीही तुम्हाला बोलायचे असेल तर थोडक्यात व पॉईंटवर बोलावे.

**<u>दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देण्याच्या संदर्भात</u>**

श्री. धनंजय मुंडे : सभापती महेदय, 7 तारखेला हिवाळी अधिवेशनाची सुरुवात झाली. 8 तारखेपासून ....

(सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त हातात फलक घेऊन बसलेले असतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त साहेब, आपल्याकडून ही अपेक्षा नाही. आपण फलक खाली घेतला तर बरे होईल.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, 8 तारखेपासून विरोधी पक्षाच्या वतीने सभागृहात सरकारने शेतकऱ्यांच्या मदतीची घोषणा करावी, ऊस, धान, फळ उत्पादक अशा सर्व शेतकऱ्यांना अगोदर सरकारने मदतीची घोषणा करावी, कर्जमुक्तीची घोषणा करावी, या गंभीर प्रश्नाकडे सरकारने या पध्दतीने लक्ष दिले तरच सभागृहात चर्चा होऊ शकते असे सांगितले जात आहे. आज जो पक्ष महाराष्ट्रात सत्तेत आहे, तोच पक्ष ओरिसाच्या सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर ओरिसाच्या शेतकऱ्यांची कर्जमाफी व्हावी यासाठी संघर्ष करत आहे. तेथे एक भूमिका आहे. (अडथळा) राज्यात दुष्काळाचे सलग चौथे वर्ष आहे.

**सभापती** : विषय गांभीर्याने घ्यावा.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, ओरिसामध्ये सलग चार वर्षे दुष्काळ नाही. महाराष्ट्रात सलग चौथे वर्ष दुष्काळाचे आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, सरकारने अगोदर कर्जमाफीची घोषणा करावी. सरकारने दुष्काळी भागातील कापूस, धान, सोयाबीन, ऊस उत्पादक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शेतकऱ्यांच्या एकरी मदतीची घोषणा अगोदर करावी तरच चर्चा होऊ शकते. सरकारने मध्य काढून घोषणा केल्यानंतर चर्चा सुरू करण्याबाबत विचार करावा.

..2



श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सदनात विरोधी पक्षाकडून सातत्याने नियम 289 अन्वये हा विषय आणून सरकारने पहिल्यांदा घोषणा करावी असे म्हणण्याच्या पाठीमागे फार मोठा आधार आहे. आपणास माहीत आहे की, विधानपरिषद सदनाचे सन्माननीय नेते श्री. एकनाथराव खडसे यांनी कृषीमंत्री या नात्याने मागच्या वेळी झालेल्या 2 दिवसांच्या चर्चेनंतर आश्वासन दिले होते. आपण सर्व आश्वासने पाहिली तर एकाही आश्वासनाची पूर्तता झालेली नाही. सन्माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेब, आपणास आठवत असेल की, आपण आणेवारीच्या संदर्भात सांगितले होते की, आणेवारीची पध्दत 3 महिन्यात बदलू, परंतु काहीही बदल झाला नाही, रोजगार हमी योजनेच्या कामांचा 40:60 चा रेश्यो बदलू, पण ते सुध्दा बदलविण्यात आले नाहीत. 5 लाख सौरऊर्जेवरील पंप देऊ असेही सांगितले होते. एक सुध्दा निर्णय झालेला नाही. माननीय मंत्री केवळ वेळ मारून नेण्यासाठी उत्तरे देत असतील तर आम्ही कशाकरिता चर्चा करायची ? (अडथळा) आम्हाला स्पष्टपणे आश्वासन पाहिजे. राज्यात साडे तीन हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. सरकारला थोडीही लाज वाटत नाही. शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने कर्जमाफी केली पाहिजे. सभापती महोदय, त्यांची सर्व भाषणे काढून पहा. प्रत्येक भाषणात सरकारने कर्जमाफी केली पाहिजे, एका शेतकऱ्याची आत्महत्या झाली की, माननीय मुख्यमंत्र्यांना कलम 302 लावले पाहिजे असे सांगितले आहे. आज ते सदनाचे नेते आहेत, त्यांना शेतकऱ्यांना सांगायला काय अडचण आहे ? सरकार आमच्याकरिता काय करणार आहे हे पाहण्यासाठी जनता विधानपरिषद, विधानसभा यांकडे लक्ष लावून बसली आहे. कापूस, सोयाबीन, संत्रा, कांदा, ऊस उत्पादक शेतकरी हे सर्वजण आशा लावून बसले आहेत की, सरकारकडून त्यांना न्याय मिळेल. वांझोटी चर्चा करण्यामध्ये काहीही अर्थ नाही. आम्हाला उत्तरात न्याय मिळाला पाहिजे. शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून कर्जमाफी झाली ....

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विनंती आहे. सभागृहाचा पाचवा दिवस आहे. सभागृहाचा पाचवा दिवसही वाया गेलेला आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपला मुद्दा सभागृहाच्या पटलावर आलेला आहे.

..3



(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य फलक घेऊन घोषणा देत वेलमध्ये येत असतात.)

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, जनतेचा पैसा वाया गेलेला आहे. चर्चा करावयाची सोडून राजकारण केले जात आहे हे बरोबर नाही. सरकार चर्चेला तयार आहे, सरकारची निर्णय घेण्याची तयारी आहे. राजकीय भाषा केली जात आहे. विरोधी पक्षाला शेतकऱ्यांविषयी आस्था नाही. मी काल टीव्हीवर पाहिले की, आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी सांगितले की, संसद चलेगा तो देश चलेगा. हे काल रात्रीचे भाषण आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य फलक घेऊन वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यही तेथे हजर होते. आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी सांगितलेले सुध्दा हे ऐकत नसतील तर दुर्दैव आहे. सरकार या संदर्भात काय निर्णय घेईल याची राज्यातील जनता आतुरतेने वाट पाहत आहे. (अडथळा) पहिला प्रश्न दुष्काळाचा आहे. परंतु विरोधकांना दुष्काळाच्या प्रश्नावर चर्चा करायची नाही, राजकारण करायचे आहे असे दिसत आहे. सभागृहाचे 5 दिवस वाया गेलेले आहेत, एवढा पैसा वाया गेला आहे. चर्चा करण्यासाठी व्यासपीठ असताना हे चर्चा करत नाहीत. आम्ही तुमचे पाप फेडत आहोत. 15 वर्षे खजिना खाली केला. 15 वर्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या. खजिना खाली आहे तोपर्यंत बोलणार.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य फलक घेऊन वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

**सभापती** : अशा स्थितीत सभागृहाचे काम चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक अर्ध्या तासासाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.07 ते 11.37 पर्यंत स्थगित झाली.)

----

....B

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, कृपया आपण मला बोलण्याची परवानगी द्यावी.

**सभापती :** विरोधी पक्ष नेत्यांना मी सागू इच्छितो की, आपण कोणत्या आयुधाच्या माध्यमातून बोलण्याची परवानगी मागत आहात, हे अगोदर सांगावे व त्यानंतर आपल्याला जे काही बोलावयाचे आहे ते मर्यादित स्वरुपात बोलावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी मघाशी बोलत असताना माननीय श्री.शरद पवार साहेबांचा उल्लेख केला. ते असे म्हणाले की, "श्री.पवार साहेबांनी कालच त्यांच्या भाषणात असे सांगितले की, सभागृहाचे कामकाज चालु दिले पाहिजे, असे त्यांचेही मत आहे." मी आपल्याला सांगू इच्छितो की, सन्माननीय श्री.शरद पवार साहेबांनी त्यांच्या केंद्रीय कृषी मंत्री पदाच्या कार्यकाळात देशातील शेतकऱ्यांचे 70 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केले होते. या त्यांच्या निर्णयाचेही अनुकरण झाले पाहिजे.

सभापती महोदय, लोकसभा असो, राज्यसभा असो, विधानसभा असो नाही तर विधानपरिषद असो, ज्या ज्या वेळी भारतीय जनता पक्ष विरोधी पक्षाच्या भूमिकेत असतो, त्या त्या वेळी त्यांनी सभागृहाचे कामकाज सुरु ठेवण्याबाबत सहकार्य केलेले नाही. लोकसभेची दोन-दोन अधिवेशने त्यांनी चालू दिली नाहीत. मात्र, त्याबाबत ते काही म्हणणार नाहीत.

सभापती महोदय, आज या ठिकाणी सलग चार दिवस शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आम्ही एवढेच म्हणतो आहोत की, शेतकऱ्यांना जे काही द्यावयाचे आहे, त्याबाबत जी काही भूमिका आहे, ती सरकारने सभागृहात स्पष्ट करावी. सभागृहाचे कामकाज व्हावे, याबाबत सरकारचीही तेवढीच जबाबदारी आहे. परंतु, सभागृहाचे नेते सरळसरळ ही जबाबदारी विरोधी पक्षावर टाकून देत आहेत. विरोधी पक्षाला सभागृहाचे कामकाज चालु द्यायचे नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. मला त्यांना ही आठवण करुन द्यावयाची आहे की, ते सत्तेत येण्यापूर्वी त्यांनी शेतकऱ्यांना जे शब्द दिले होते, सत्तेत आल्यानंतर मागील दोन अधिवेशनांमध्ये जे शब्द दिले होते, तेवढे तरी त्यांनी पूर्ण

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे........

करावेत. त्यांनी विरोधी पक्षाला शब्द दिला होता, तो शब्द त्यांनी पूर्ण करावा, एवढीच आमची मागणी आहे.

सभापती महोदय, यांनी लोकांना वेगळी स्वप्ने दाखविली आणि केले वेगळेच. त्यानंतर सुध्दा आम्ही या सरकारशी मागील काही अधिवेशनांमध्ये चर्चा केलेली आहे. मागील हिवाळी अधिवेशनात, अर्थसंकल्पीय अधिवेशनात, पावसाळी अधिवेशनात आम्ही चर्चा केली. त्यानंतर सरकारने काही घोषणा केल्या. या सरकारने अशी घोषणा केली होती की, दुबार पेरणीसाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी 1500 रुपये देण्यात येतील. परंतु, एकाही शेतकऱ्याला ही मदत मिळालेली नाही. या राज्यातील एखादा तरी शेतकरी आपण दाखवावा की, ज्याला 1500 रुपयांची मदत मिळालेली आहे. आपल्याला एकही शेतकरी सापडणार नाही. मग या सरकारशी कशासाठी चर्चा करायची ? म्हणून आमची मागणी आहे की, या सरकारने अगोदर मदतीबाबतची घोषणा करावी, त्याबाबतची जी काही भूमिका आहे, ती सरकारने सभागृहात स्पष्ट करावी. सरकारला एक रुपया द्यावयाचा आहे, चार आणे द्यावयाचे आहेत, आठ आणे द्यावयाचे आहेत, ते द्यावेत. पण त्याबाबतची घोषणा अगोदर करावी.

...C-1.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझ्याकडे तारांकित प्रश्नांची यादी आहे. आपण अद्याप प्रश्नोत्तरे पुकारलेली नाहीत. परंतु, तारांकित प्रश्नांच्या यादीतील पहिल्या क्रमांकाच्या प्रश्नाला दिलेल्या उत्तरात जे छापून आलेले आहे त्याची जबाबदारी आपल्याला निश्चित करावी लागेल. ही गंभीर बाब आहे. लेखी उत्तरात असे छापून आले आहे की, "आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना रु.1.00 एवढे सानुग्रह अनुदान देण्यात येते." 1 लाख रुपयांऐवजी 1 रुपया असे छापून आले आहे. या संदर्भात प्रश्नाच्या चर्चेच्या वेळी मंत्री महोदय दुरुस्ती मांडतील. परंतु, ज्यांनी ही चूक केलेली आहे, अशा अधिकाऱ्यावर कारवाई झाली पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

**सभापती :** ठीक आहे. माझ्या निदर्शनास ते आणून देण्यात आले आहे. या संदर्भात उचित कारवाई केली जाईल.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मी माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते आणि सभागृह नेते श्री.एकनाथराव खडसे साहेबांकडे जाऊन त्यांना ही चूक दाखविली आहे. आपण कृपया माझे म्हणणे ऐकून घ्यावे. (...अडथळा...) आधी केले म्हणजे तुम्ही संवेदनशील नाही ना ? आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना फक्त 1 रुपया सानुग्रह अनुदान, असे छापील उत्तर आहे. सरकार हे उत्तर बघत नाही का ? या झालेल्या चुकीबद्दल माननीय महसूल मंत्र्यांनी माफी मागावी, दिलगिरी व्यक्त करावी, शेतकऱ्यांची दिलगिरी व्यक्त करावी, शेतकऱ्यांची माफी मागावी.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे. लेखी उत्तरात 'रु.1.00' असे जे छापून आले आहे, ती प्रिंटिंग मिस्टेक आहे. यामध्ये मला सुधारणा करावयाची आहे, असे मी आपल्याकडे यापूर्वीच पत्र दिलेले आहे आणि या संदर्भात चौकशी करावी, अशी विनंतीही केलेली आहे. परंतु, यांना नंतर जाग आली. ही जी प्रिंटिंग मिस्टेक आहे ती विधान भवनाच्या प्रिंटिंग प्रेसमध्ये झालेली आहे. माननीय प्रभाताई असताना 1995 ते 2000 पर्यंतच्या झोपड्या नियमित करण्यासंदर्भात जी चूक झाली होती, तशी ही चूक नाही. ही चूक प्रिंटिंग प्रेसमध्ये झालेली आहे. माझी विनंती आहे की, ज्यांनी ही चूक केलेली आहे.... मी तर

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे............

सुधारणा अगोदरच दिलेली आहे. तारांकित प्रश्न चर्चेला येण्यापूर्वी मी माननीय सभापती महोदयांना पत्र दिलेले आहे की, हे चुकीचे आहे, मला यामध्ये दुरूस्ती करावयाची आहे. परंतु, प्रश्नोत्तरेच झाली नाहीत. प्रश्न पुकारल्यानंतर दुरूस्ती करता येते. अगोदर दुरूस्ती करता येत नाही. सभापती महोदय, या संदर्भात चौकशी करून कारवाई करावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,....

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे साहेब हे योग्य नाही. आपण मला बोलू द्यावे. मी दोघांचीही बाजू ऐकून घेतली आहे. सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे साहेबांनी पॉईंट ऑफ ऑर्डर उपस्थित केला. माननीय श्री.दिवाकर रावते साहेबांनी आणि माननीय सभागृह नेत्यांनी देखील या संदर्भात सांगितले आहे. या संदर्भात त्यांनी दिलेली दुरुस्ती माझ्याकडे आलेली आहे. योग्य ती तपासणी करून सोमवार पर्यंत हा अहवालच मी येथे मांडतो. शासनाची चूक आहे की, आमच्या प्रिंटिंग प्रेसची चूक आहे, हे आपल्या समोर येईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, 7 तारखेला अधिवेशन सुरु झालेले आहे. तेव्हा पासून विरोधी पक्ष सातत्याने महाराष्ट्रातील, विदर्भातील, मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या जीवन मरणाशी संबंधित असलेल्या प्रश्नांसंदर्भात मागणी करीत आहे की, शासनाने कर्ज मुक्तीची घोषणा करावी. परंतु, असा आरोप केला जातो की, अधिवेशन सुरु झाल्यापासून विरोधी पक्ष कामकाज करु देत नाही, चर्चा करु देत नाही. नागपूर पासून मुंबई पर्यंत आणि मुंबई पासून नागपूर पर्यंत आजच्या क्षणापर्यंत सातत्याने चर्चाच सुरु आहे. परंतु, खोदा पहाड आणि चुहा भी नही निकला, अशी परिस्थिती आहे. पाप यांनी करावयाचे आणि खापर मात्र विरोधी पक्षावर फोडावयाचे हे बरोबर नाही. आमची एकच मागणी आहे की, जर सरकार शेतकऱ्यांबद्दल संवेदनशील असेल (...अडथळा..) अहो, चर्चा झाली ना ? माननीय श्री.दिवाकर रावते साहेब आपणच विदर्भामध्ये दिंड्या काढल्या होत्या. तो इतिहास आपण विसरु नका. म्हणजे सत्तेमध्ये नसताना आपण जे केले ती नाटक होती काय ? आम्ही आपल्याबद्दल आदर बाळगतो. आपण शेतकऱ्यांच्या संदर्भात अत्यंत

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे........

कष्ट घेतले हे आम्ही विसरलेलो नाही. परंतु, आज सत्तेवर आल्यानंतर मात्र आपण शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे ढुंकुनही बघत नाही आणि तुम्ही येथे 1 रुपयाची तरतूद करता ? आमचे म्हणणे एवढेच आहे की, आता चर्चा खूप झाली, चर्चा लय झाली. आपण कृपया विषाची परीक्षा बघू नये, अशी आमची आपल्या माध्यामातून शासनाला विनंती आहे. शासनाने अगोदर कर्जमुक्तीची घोषणा करावी, कर्जमाफीची घोषणा करावी आणि त्यानंतर चर्चेला सुरुवात करावी, अशी आमची मागणी आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी मागणी केलेली आहे....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी बोलताना माझ्या नावाचा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे मी व्यक्तिगत खुलासा करीत आहे. त्यांनी माझ्या संवेदनांची मला चांगली जाणीव करुन दिल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. (...अडथळा...) त्यांनी माझे नाव घेतलेले आहे. त्यांनी माझ्या संवेदनांची जाणीव करुन दिल्याबद्दल मी मनापासून त्यांचे आभार मानतो. मी अत्यंत नम्रपणे आपल्या माहितीकरिता सांगू इच्छितो की, होय, आम्ही सरकारमध्ये आहोत. त्यामुळे मागील 4 महिन्यांपासून आमच्या पक्षाचा, आमच्या पक्ष प्रमुखांचा, आमच्या सर्व मंत्र्यांचा, पदाधिकाऱ्यांचा मराठवाड्यातील गावागावांमध्ये सातत्याने वावर आहे. (...अडथळा...) आपण मला संवेदना विचारल्या आहेत. आता आपण कृपया मध्ये बोलू नका.

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसून बोलू नये. मी आपल्याला सांगू इच्छितो की, हे बरोबर नाही. मी सकाळी 11.00 वाजेपासून आपल्या सर्वांना विचारीत आहे की, आपण कोणत्या माध्यमातून मुद्दा उपस्थित करीत आहात ? परंतु, ते बाजूलाच राहिले. तरी देखील मी समन्यायाचे तत्व पाळण्यासाठी आपल्याला आणि त्यांनाही बोलण्याची संधी देत आहे. आता आपण कृपया माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांना बोलू द्यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी अत्यंत नम्रपणे सांगितले आणि त्यांचे आभार मानले. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी कृपया एवढा संताप व्यक्त करु नये. मी जाणीव ठेऊनच बोलत असतो. आम्ही सरकारमध्ये असतानाही, सरकारने ज्या घोषणा केलेल्या

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

आहेत त्यांची अंमलबजावणी होते किंवा नाही हे बघण्याकरिता अधिकृतरीत्या सरकार म्हणून मी जातो. (...अडथळा...) आपण कृपया मला बोलू द्यावे. मी आपल्याला नम्रपणे सांगू इच्छितो की, दृष्काळग्रस्त भागात, जेथे मदत पोहचू शकली नाही, तेथे पक्षाच्या वतीने आदरणीय श्री.उद्धवजी ठाकरे साहेबांच्या श्रमातून जे निर्माण झाले आहे, त्या निधीतील पैसे आम्ही लोकांपर्यंत पोहोचवित आहोत. मी नांदेड आणि परभणी जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून तेथे ज्या 201 आत्महत्या नोंदविल्या आहेत त्या प्रत्येक घरात गेलो. केवळ त्या घरातच गेलो नाही तर त्यांचा उदरनिर्वाह चालावा यासाठी आम्ही त्यांना मदत केली. मदत तर सर्वच करतात, करीत होते. परंतु, आम्ही त्यांना भविष्यात मदतीची गरज लागू नये म्हणून 3-3 शेळ्या दिलेल्या आहेत. अशा प्रकारच्या संवेदना आम्ही बाळगलेल्या आहेत. आम्ही लोकांपर्यंत पोहोचतो. मी गावागावांमध्ये जाऊन बैठका घेतो. लोकांबरोबर चर्चा करतो आणि सरकारच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचतात किंवा नाही हे बघतो.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,...

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे साहेब हे बरोबर नाही. मी आपल्याला नेहमीच बोलण्याची संधी देत असतो. आता सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आम्ही मागील 4 दिवसापासून तीच मागणी करीत आहोत. मागील 5 दिवसांपासून सभागृहाचे कामकाज होत नाही. सभागृहाचे कामकाज सुरु ठेवण्याची जबाबदारी माननीय संसदीय कार्यमंत्र्यांची आहे. (..अडथळा...) विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षामध्ये समन्वय ठेवण्याचे काम माननीय संसदीय कार्यमंत्री करीत असतात. माझे असे म्हणणे आहे की, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एक मागणी केली आहे. दुष्काळ, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी किंवा वादळामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासंदर्भात मागील 4 अधिवेशनात सरकारने काही घोषणा केल्या आहेत. त्याबाबत काय झाले, हे अगोदर शासनाने सांगावे. सरकारने अगोदर कर्जमाफी जाहीर करावी आणि तसे करता येत नसेल तर 20 टक्के किंवा 50 टक्के कर्जमाफी करतो किंवा व्याज कमी करतो, अशी काही तरी दिलासादायक घोषणा करावी, अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...........

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सभागृह नेत्यांना सांगू इच्छितो की, या सभागृहाला काही प्रथा आणि परंपरा बदण्याचे देखील अधिकार आहेत. एखाद्या प्रश्नावर चर्चा झाल्यानंतरच शासनाने घोषणा करावी, ही आपली प्रथा आहे. परंतु, चर्चेअगोदर घोषणा करण्याची प्रथा आपण नव्याने निर्माण करु शकतो. (...अडथळा...) म्हणूनच शासनाने अगोदर घोषणा करावी व त्यानंतर आपण चर्चा करु, अशी आमची मागील 5 दिवसापासून मागणी आहे.

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी जो खुलासा केला तो पक्षाच्या वतीने केलेला आहे. ते सरकार म्हणून सभागृहात बसलेले आहेत. माझा पक्ष देखील आज 500 कार्यकर्त्यांना घेऊन मराठवाड्यात काम करीत आहे.

..D-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

महिन्यातील आठ दिवस मी मराठवाड्यात राहतो. त्या ठिकाणी मी अनेक पोकलॅन्ड मशीन पाठविल्या आहेत, माझ्या पक्षाचे 500 कार्यकर्ते मराठवाड्यात आज काम करीत आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्राची परिस्थिती काय आहे ते मी सांगत आहे. आम्ही मराठवाड्यातील लोकांना दिवाळी भेट दिली आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची परिस्थिती मंत्री महोदयांनी सांगितली आहे. माननीय श्री.उद्धवजी ठाकरे मराठवाड्यात गेले होते. त्यांनी दुष्काळग्रस्तांना मदत केली. आमच्या पक्षाने जी मदत केली त्याबाबत आम्ही कधी टीव्हीवर बातमी दिली नाही किंवा वर्तमानपत्रात छापून आणले नाही. त्यांची गरिबी आणि त्यांच्या दारिद्र्याचे धिंडवडे आम्ही काढण्यास तयार नाही. आम्ही कोणत्याही वर्तमानपत्राला यासंदर्भातील माहिती दिली नाही. मी स्वतः मराठवाड्यात दिवाळी साजरी केली. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांसोबत आम्ही दिवाळी साजरी केली. माझ्या पक्षाचे सर्व आमदार त्या ठिकाणी गेले होते. मंत्री महोदय श्री.दिवाकर रावते यांच्याबाबत मला आदर आहे परंतु सरकार म्हणून ते अपयशी ठरले आहेत. पक्ष म्हणून त्यांनी मराठवाड्यात मदत केली आहे. सरकारने या ठिकाणी पहिल्यांदा कर्जमाफी जाहीर करावी त्यानंतर चर्चा करावी अशी माझी मागणी आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, या ठिकाणी आम्हाला मंत्री महोदयांनी आश्चर्याचा धक्का दिलेला आहे. आम्ही सरकारमध्ये आहोत पण सरकारला संवेदना नाहीत असे स्पष्टपणे मंत्री महोदय श्री.दिवाकर रावते यांनी कबूल केले आहे. (..अडथळा..) सभापती महोदय, आपण रेकॉर्ड तपासून पहावे. दुसऱ्या कोणालाही संवेदना नाहीत, आज ते सरकारमध्ये मंत्री आहेत. शासनाला संवेदना नाहीत अशा प्रकारची भूमिका मंत्री महोदय घेत आहेत, त्यामुळे यांना सरकारमध्ये राहण्याचा कोणताही अधिकार नाही. शिवसेना व भारतीय जनता पक्षाने वेगवेगळा जाहीरनामा तयार केलेला आहे. भारतीय जनता पक्षाच्या जाहीरनाम्याबाबत मी नंतर बोलणार आहे. परंतु शिवसेना पक्षाने जाहीरनाम्यात स्पष्टपणे नमूद केले होते की, शेतकऱ्यांनी पिकविलेल्या कापूस, सोयाबीन, मका किंवा कांदा या पिकांच्या नुकसानीची तपासणी करण्यासाठी एक समिती स्थापन करु व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देऊ. असे शिवसेना पक्षाच्या जाहीरनाम्यात नमूद केले

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

होते. मंत्री महोदय हे सांगण्याऐवजी आम्ही किती दौरे केले, आम्ही किती संवेदनशील आहोत, असे नाटक करण्याचे काम शिवसेना पक्ष करीत आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य हातात फलक घेऊन वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आपण सर्व सन्माननीय सदस्यांचे म्हणणे एकूण घेतले आहे. सरकारची याबाबत घोषणा करण्याची तयारी आहे. चर्चेच्या अगोदर आम्ही हेच ठरविले होते की, सरकारला घोषणा करावयाची आहे. दुष्काळावरील चर्चेचा प्रस्ताव विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी दिलेला होता. आता दोन्ही पक्षानी प्रस्ताव दिलेला आहे. विरोधकांनी दिलेल्या प्रस्तावाचा अवमान होऊ नये म्हणून कमीत कमी चर्चा तरी केली पाहिजे. मागील काळात 70 हजार कोटी रुपयांची कर्ज माफी माननीय श्री.शरद पवार यांनी केली होती ही बाब मला मान्य आहे. 70 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केल्यानंतरही या राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या का वाढल्या याबाबत मी माननीय श्री.शरद पवार यांच्याकडून सल्ला घेणार आहे.

**सभापती** : कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी जागेवर बसावे, सभागृहाची बैठक मी 20 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 11.53 ते 12.13 वाजेपर्यंत स्थगित झाली)

....E....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

(सभागृहात विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य घोषणा देत असतात)

**उप सभापती** : सभागृहातील वातावरण लक्षात घेता चर्चा करण्यास अनुकूल काळ दिसत नाही. त्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.15 ते 12.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----

एफ.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगिती नंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, राज्यातील सर्व शेतकऱ्यांचे लक्ष हिवाळी अधिवेशनाकडे लागलेले आहे. हे सरकार सत्तेवर आल्यानंतर सलग तीन अधिवेशने झाली आहेत. या तीनही अधिवेशनात शेतकऱ्यांच्या मदतीसाठी जे निर्णय झालेत त्याची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे आम्ही पुन्हा पुन्हा आग्रह करीत आहोत, आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करीत आहोत की, येथे कर्ज मुक्तीच्याबाबत सरकारने घोषणा करावी. त्यानंतर मग सभागृहाचे कामकाज सुरू करण्याबाबत आमचे काहीच म्हणणे नाही. आता शेतकऱ्यांच्या संबंधातील एकही ओळ समोर बसलेल्या सत्ताधाऱ्यांना पटत नाही. एनडीएचे घटक पक्ष आहेत त्या राज्यात म्हणजे तेलंगणात कर्ज मुक्ती देण्यात आली आहे.

श्री.विनोद तावडे : स्वीत्झरलँड...

श्री.धनंजय मुंडे : स्वीत्झरलँड मध्ये भाजप नाही. तेथे भाजप नाही. सीमांध्रात कर्ज मुक्ती दिली आहे. ओरिसामध्ये मागणी करताच...... असे दुटप्पी धोरण आपण अवलंबू नका. जे बिहारमध्ये झाले ते महाराष्ट्रामध्ये होण्यास वेळ लागणार नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, या सरकारने शेतकऱ्यांच्या बाबतीतील भूमिका स्पष्ट केली पाहिजे. या शेतकऱ्यांची आपणाला मते देऊन सत्तेमध्ये बसविले आहे. आपणच शेतकऱ्यांना स्वप्ने दाखविली होती की, 50 टक्के खर्चाच्यावर शेतकऱ्यांना हमी भाव देऊ. ही स्वप्ने आम्ही दाखविली नाहीत. लोकसभा आणि विधान सभेच्या निवडणुकीत आपणच शेतकऱ्यांना स्वप्ने दाखविली आहेत. आज ती स्वप्ने पूर्ण करावीत अशी आम्ही मागणी केली तर नाही म्हणता. त्यामुळे असले दुटप्पी धोरण अवलंबू नका. शेतकरी वाचला तर राज्य वाचेल, देश वाचेल. शेतकऱ्याला अडचणीत आणण्याचा प्रयत्न सरकार करीत असेल तर आम्ही येथे चर्चा करणार नाही. कारण मागच्या तीनही अधिवेशनात आम्ही चर्चा केलेली आहे. या चर्चेतून सरकारकडून जे उत्तर आले त्याची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे येथे अगोदर सरकारने घोषणा करावी. घोषणेशिवाय सभागृहाचे कामकाज होणे म्हणजे शेतकऱ्याचा अवमान आहे. विरोधी पक्ष म्हणून तो अवमान आम्ही कधीच होऊ देणार नाही.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी घोषणा देतात.)



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझे एवढेच म्हणणे आहे की, मराठा आरक्षणावरील महत्त्वाची लक्षवेधी सूचना आज आहे. त्यास विरोधी पक्षाचा विरोध आहे काय ?

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

यांना मराठा आरक्षण होऊ द्यायचे नाही काय, मराठा आरक्षणाला राष्ट्रवादी काँग्रेसचा विरोध आहे.

....(गोंधळ).....

हे आपण मुद्दाम करीत आहात. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस मराठा आरक्षणाला आज छुपा विरोध करीत आहे. शेतकऱ्यांच्या नावाखाली मराठा आरक्षणा ......

**उप सभापती :** सभागृहाचे कामकाज एक तासाकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.34 ते 1.34 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

G-1......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मला पॉईंट ऑफ प्रोसिजरच्या मुद्यासंदर्भात बोलावयाचे आहे.

**सभापती :** आज सकाळपासून सभागृहात जे काही चालले आहे त्यासंदर्भात माझ्या मनात काही भावना आहेत. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांचे विचार व्यक्त करुन झाल्यानंतर मी माझ्या मनातील भावना व्यक्त करणार आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी पॉईंट ऑफ प्रोसिजरवर आपले विचार व्यक्त करावेत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सदनामध्ये शेतकऱ्यांना न्याय मिळावा ही विरोधी पक्षाची भूमिका असून ती भूमिका विरोधी पक्ष नेते श्री. धनंजय मुंडे सविस्तरपणे मांडत असताना त्यांनी सरकारला स्पष्टपणे सांगितले होते की, शासनाने शेतकऱ्यांना जी आश्वासने दिलेली दिलेली आहेत ती आश्वासने शासनाने पूर्ण केली नाही तर महाराष्ट्रात बिहार राज्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. बिहारमध्ये आपली जी अवस्था झाली आहे तीच अवस्था महाराष्ट्रात देखील होईल अशा प्रकारची भूमिका विरोधी पक्ष नेते या ठिकाणी मांडत असताना या राज्याचे जबाबदार शिक्षण मंत्री श्री.विनोद तावडे यांनी या ठिकाणी विरोधी पक्षाच्या संदर्भात संसदीय पध्दतीला काळिमा फासणारी टिप्पणी केलेली आहे. सत्तारुढ पक्षाकडून विरोधी पक्षासोबत जो व्यवहार केला जातो तो बरोबर नाही. विरोधी पक्ष नेते शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासंदर्भात आपले विचार मांडत असताना शिक्षण मंत्र्यांनी अंग विक्षेप करुन "तुम्ही स्वित्झरलॅंड, लंडन, शेख चिल्ली" अशा प्रकारचा उल्लेख केलेला आहे. सत्ताधारी पक्षाने विरोधी पक्षाचा सन्मान करणे आवश्यक असताना, विरोधी पक्ष नेत्यांचे म्हणणे काय आहे हे समजून न घेता मंत्री महोदयांनी शेतकऱ्यांच्या संदर्भात पॉझिटीव्ह भूमिका घेणे आवश्यक होते. विरोधी पक्ष नेते कर्जमाफीच्या संदर्भात बोलत असतील,शेतकऱ्यांना मदत करावी यासाठी विरोधी पक्ष नेते बोलत असतील व असे असताना त्यांना गप्प करण्याचा प्रयत्न सरकारकडून होत असेल तर ते योग्य नाही. (अडथळा) त्यामुळे सन्माननीय मंत्री श्री. विनोद तावडे यांनी सदनाची माफी मागितली पाहिजे.सन्माननीय शिक्षण मंत्र्यांनी केवळ माननीय विरोधी पक्षाचा अपमान केला नसून त्यांनी राज्यातील जनतेचा अपमान केलेला असल्यामुळे शिक्षण मंत्र्यांनी या सदनाची माफी मागितली पाहिजे, दिलगिरी व्यक्त केली पाहिजे. नाही तर आम्ही पुढचे कामकाज होऊ देणार नाही. ...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती :** मी सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांचे म्हणणे ऐकले आहे. आता मी संसदीय कामकाज मंत्र्यांना बोलण्याची संधी देत आहे.

श्री. गिरीष बापट : सभापती महोदय, 7 डिसेंबरपासून सभागृहाचे कामकाज सुरु झाले आहे. परंतु....

**सभापती :** संसदीय कामकाज मंत्री आपण सभागृहात सुरु असलेल्या विषयावर बोलणार आहात की, दुसऱ्या विषयावर बोलणार आहात ?

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, मी दुसऱ्या विषयावर बोलणार आहे.

**सभापती :** मला वाटते हा विषय संपल्यानंतर आपण बोलले तर ते बरे होईल. आता सन्माननीय शिक्षण मंत्री श्री. तावडे साहेबांनी आपले विचार व्यक्त करावेत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, ....

**सभापती :** नैसर्गिक न्यायानुसार मला सन्माननीय मंत्री महोदयांचे विचार ऐकून घ्यावे लागणार आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ नेते,सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे (अडथळा) यांनी माझ्या नावाचा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे मी काय बोलतो आहे ते त्यांनी ऐकण्याची तसदी घ्यावी एवढी माझी विनंती आहे. मी काय बोलणार आहे ते ऐकून न घेता असहिष्णुता बोलावयाचे ते बरोबर नाही. मी सुध्दा या सभागृहाचा विरोधी पक्ष नेता होतो. (अडथळा) या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी माझ्या नावाचा उल्लेख करुन माझ्या संदर्भात जे वक्तव्य केलेले आहे त्यासंदर्भात मला माझी भूमिका मांडावयाची आहे.

...H-1.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

सभापती महोदय, मी देखील या सभागृहाचा विरोधी पक्ष नेता होतो. मला या सभागृहाच्या मानमर्यादा चांगल्या माहीत आहेत. माझे असे स्पष्ट मत आहे की, महाराष्ट्रातील प्रश्न असल्यामुळे महाराष्ट्राच्या संदर्भात बोलले पाहिजे. या ठिकाणी तेलंगणा, ओरिसा राज्यांचा उल्लेख करण्यात आला. त्यावर मी म्हटले की, आपणास बाहेरील राज्यांचा उल्लेख करावयाचा असेल तर बाहेरील देशांचा उल्लेख करावा...

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात )

**सभापती :** मला त्यांचे म्हणणे ऐकून निर्णय द्यावयाचा आहे. तेव्हा कृपया सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील शेतकरी, महाराष्ट्रातील प्रश्न असतील तर महाराष्ट्राचा रेफरन्स देऊन बोलले पाहिजे असा माझा आग्रह आहे. तो आग्रह धरत असताना मी अंगविक्षेप केले नाही. मी अंगविक्षेप करीत नाही. माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त म्हणाले की, काल अमुक अमुक भाषण चांगले झाले, मग आम्ही कौतुक केले. त्यावर आम्ही अरे काय इथे विषय उपस्थित केला, असे म्हटले का ? आपण विषयाला धरुन बोलले पाहिजे असे माझे मत आहे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे हे या सभागृहातील ज्येष्ठ सदस्य आहेत. आपण नि:पक्ष बोलता असे मी गृहीत धरतो. ते समजतात तसे माझ्या मनात अजिबात नाही. मी विरोधी पक्ष नेता म्हणून काम केलेले आहे. पण आपल्या सारख्या ज्येष्ठ सदस्यांना तसे वाटले असेल तर मी माझे वक्तव्य मागे घेतो. त्यात मला काहीही संकोच नाही. या सभागृहाची मानमर्यादा सांभाळणारा मी सदस्य आहे. मी प्रामाणिकपणे सांगतो की, राज्याचा प्रश्न असल्यामुळे राज्याच्या प्रश्नावर चर्चा करु या. राज्याचा बिहार होईल, अमुक होईल, अशी शेखचिल्ली स्वप्ने कशाला पहायची असे मी बोललो असेन. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्यासारख्या ज्येष्ठ सदस्यांना तसे वाटत असेल त्यामध्ये एक टक्का असेल सुद्धा, जर तसे असेल तर माझे वक्तव्य कामकाजातून काढून टाकण्यास माझी काही हरकत नाही.

**सभापती :** ठीक आहे. हा विषय येथेच संपला आहे असे मी मानतो.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, दिनांक 7 डिसेंबर, 2015 पासून अधिवेशन सुरु झाले. सभागृहाची बैठक सुरु होण्यापूर्वी माननीय विरोधी पक्ष नेत्यांसमवेत आणि गट नेत्यांसमवेत आपल्या दालनात चर्चा करुन कामकाजाचा क्रम आणि त्याची प्रायॉरीटी ठरवून घेत असतो. हे वरिष्ठ सभागृह आहे. अधिवेशन सुरु होऊन पाच दिवस झाले, परंतु या ठिकाणी कामकाजाची एकही ओळ झालेली नाही. सभागृहाचे कामकाज होण्यासाठी आम्ही आपल्याकडे विनंती केली होती. शेतकऱ्यांच्या संदर्भात आपल्या ज्या भावना आहेत तशाच आमच्याही भावना आहेत. आपण त्या संदर्भात चर्चा करुन योग्य तो निर्णय घेऊन त्याबाबतची भूमिका शासनामार्फत जरूर सांगण्यात येईल. अधिवेशन सुरु होऊन पाच दिवस झाले. या पाच दिवसांत प्रश्नोत्तराचा तास झाला नाही, लेईंग झाले नाही, लक्षवेधी सूचनांवर चर्चा झाली नाही. विधानसभा सभागृह सुरु आहे, त्याचा रेफरन्स येथे द्यायचा नसतो, परंतु मी तो मुद्दामहून देत आहे. तेथे माननीय विरोधी पक्ष नेत्यांबरोबर चर्चा केल्यानंतर सभागृहाचे कामकाज सुरु झालेले आहे. आम्ही आपल्या दालनात दोन वेळा आलो होतो. माझी आपणास विनंती आहे की, आपण उर्वरित कामकाज सुरु करावे.

**सभापती :** मला आता काही गोष्टींबाबत स्पष्ट बोलण्याची वेळ आली आहे. सन्माननीय सदस्यांचे याला बोलू द्या, त्याला बोलू द्या, असे जे सारखे चालले आहे,त्याबाबत सांगतो की, कोणाला बोलू द्यायचे हा संपूर्ण् निर्णय माझा आहे. तेव्हा कृपया आपण माझ्याकडे तसा आग्रह धरु नका. आता मी पुढील कामकाज पुकारत आहे.

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य हातात फलक घेऊन माननीय सभापतींच्या आसनाजवळ येऊन घोषणा देत असतात.)

**पृ.शी./मु.शी.:** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.सुभाष देसाई (उद्योग मंत्री ) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2011-2012 या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.दिलीप कांबळे (सामाजिक न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांचा सन 2012-2013 या वर्षाचा तिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य हातात फलक घेऊन माननीय सभापतींच्या आसनाजवळ येऊन घोषणा देत असतात.)

**पृ.शी./मु.शी.:**विधेयकांना संमती व अधिसंमती

**सभापती :** विधानपरिषदेने संमत केलेल्या विधेयकाला विधानसभेची संमती व दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपतींची / राज्यपालांची अधिसंमती मिळाल्यासंबंधीची यादी सचिव वाचून दाखवतील.

सचिव : (अ) विधानपरिषदेने संमत केलेल्या खालील विधेयकाला विधानसभेची संमती मिळाली :-

सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 10 - महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) विधेयक, 2015

(ब) खालील विधेयकाला राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाली :-

सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 36 - कारखाने (महाराष्ट्र सुधारणा ) विधेयक, 2015

(क) खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली :-

(1) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 26 - महाराष्ट्र लोकसेवा हक्क विधेयक, 2015

(2) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 27- हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, 2015

(3) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 29-महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, 2015.

(4) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 30-महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, 2015.

(5) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 31- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा ) विधेयक, 2015 .

(6) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 32 - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, 2015.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

..5..

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य हातात फलक घेऊन माननीय सभापतींच्या आसनाजवळ येऊन घोषणा देत असतात.)

सचिव.....

(7) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 33 - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) विधेयक, 2015

(8) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 34 - महाराष्ट्र विद्यापीठे (विद्यापीठ प्राधिकरणे व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे) विधेयक, 2015

(9) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 35 - महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, 2015.

(10) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 38 - महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक, 2015.

(11) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 39 - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, 2015.

(12) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 40- महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) विधेयक, 2015.

(13) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 41- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (दुसरी सुधारणा) विधेयक, 2015.

(14) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 47- संदीप विद्यापीठ विधेयक, 2015.

(15) सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 48 - एमआयटी आर्ट, डिझाईन ॲण्ड टेक्नॉलॉजी विद्यापीठ विधेयक, 2015.

(16) सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 10- महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) विधेयक, 2015.

(17) सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 11- महाराष्ट्राचा मासेमारीबाबत (सुधारणा) विधेयक, 2015.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य हातात फलक घेऊन माननीय सभापतींच्या आसनाजवळ येऊन घोषणा देत असतात.)

**पृ.शी.:** धनगर व धनगड हे एक आहेत किंवा कसे या संदर्भात टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्सेस यांचेकडून अहवाल घेणे
**मु.शी.:** धनगर व धनगड हे एक आहेत किंवा कसे या संदर्भात टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्सेस यांचेकडून अहवाल घेणे यासंबंधी माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे निवेदन

श्री.विष्णू सवरा ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये निवेदन करतो.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

I-1.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे

श्री.रामनाथ मोते (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आश्वासन समितीचा एकशे नव्वदावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : आश्वासन समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-------

(विरोधी पक्षाचे काही सदस्य हातात फलक घेऊन माननीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनासमोर घोषणा देत असतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

(विरोधी पक्षाचे काही सदस्य हातात फलक घेऊन माननीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनासमोर घोषणा देतच असतात.)

**पृ.शी./मु.शी.:** अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे व संमत करणे

प्रा.अनिल सोले (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

सभापती महोदय, गुरुवार, दिनांक 10 डिसेंबर, 2015 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 10 डिसेंबर, 2015 रोजी समितीची बैठक झाली. तथापि, सदरहू बाब घेण्यात न आल्याने शुक्रवार, दिनांक 11 डिसेंबर, 2015 रोजी अशासकीय कामकाज पुन्हा दर्शविण्यात आले आहे. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनीटांचा वेळ उपलब्ध आहे. त्यानुसार 3 अशासकीय ठरावांना खालीलप्रमाणे वेळ देण्यात यावा, अशी शिफारस समितीने केली आहे.

<u>बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय ठराव</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.ख्वाजा बेग, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक - 45 | 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| 2. | श्री.किरण पावसकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक - 105 | 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| 3. | श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.यांचा ठराव क्रमांक - 13 | 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही. |

**सभापती** : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

प्रा.अनिल सोले : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला संमत आहे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी. :** नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : माझ्याकडे दिनांक 8 डिसेंबर, 9 डिसेंबर, 10 डिसेंबर व 11 डिसेंबर, 2015 रोजी नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झाल्या होत्या त्या संदर्भातील माझे निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : **दिनांक 8 डिसेंबर, 2015 रोजीच्या सूचना** :-

सन्माननीय सदस्य श्री. आनंद ठाकूर यांनी "बोईसर (जि.पालघर) येथील तारापूर अणुऊर्जा केंद्र तसेच बीएआरसीमध्ये काम करणाऱ्या सुमारे दीड हजार कंत्राटी कामगारांची दैनंदिन पगारात होत असलेली फसवणूक" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी "राज्यातील खुल्या प्रवर्गातील उमेदवारांच्या सरकारी नोकरी भरतीकरिता आवश्यक असलेल्या वयोमर्यादेत इतर राज्यांमध्ये असलेल्या वयोमर्यादेप्रमाणे वाढ करण्याची होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी "मराठवाड्यात विशेषतः बीड जिल्ह्यातील बेरोजगार युवक रिक्षा चालकांना शासनाच्या जाचक अटींमुळे परवाना मिळण्यास व नूतनीकरण प्रक्रियेत येत असलेल्या अडचणी, अपघातग्रस्त रिक्षा चालकांना विमा संरक्षण किंवा आर्थिक मदत न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "मुंबई व कोकण विभागातील महाविद्यालयीन शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी मिळणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सदस्य हातात फलक घेऊन माननीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनासमोर घोषणा देतच असतात.)

सचिव.....

**दिनांक 9 डिसेंबर, 2015 रोजीच्या सूचना :-**

सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी "महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्यासाठी शासनाकडून कोणतेही अनुदान दिले जात नसणे, ई.ॲण्ड पी. शुल्कात झालेली कपात, त्या अनुषंगाने प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना वेतन, भत्ते व निवृत्ती वेतन मिळण्यास येत असलेल्या अडचणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी "राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमातींच्या आश्रमशाळांमधील शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र शाळा संहिता तयार करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी "डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला केंद्रीय विद्यापीठाचा दर्जा मिळवून देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी "राज्यातील विविध जिल्ह्यातील आदिवासी वसतिगृहात राहणारे विद्यार्थी मंत्री महोदयांकडे दाद मागण्याकरिता आले असता त्यांना झालेली मारहाण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "राज्यातील सर्व जिल्हा परिषद शिक्षकांचे एकच रोस्टर करणे, अशैक्षणिक कामांचे ओझे दूर करणे व आत्महत्याग्रस्त शिक्षकांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर नोकरीवर घेण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सदस्य हातात फलक घेऊन माननीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनासमोर घोषणा देतच असतात.)

सचिव....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी "बीड जिल्हा शासकीय रुग्णालयातील गलथान कारभारामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

**दिनांक 10 डिसेंबर, 2015 रोजीच्या सूचना :-**

सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी "पुणे जिल्ह्यातील वानवाडी मधील महिला सुधारगृहातून 38 महिलांनी केलेले पलायन" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "सासवणे (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील इंद्रपै येथील गट नं.97 मध्ये चुकीचा 7/12 उतारा तयार करणे, श्री.राकेश कुमार वधावन यांनी आपल्या बंगल्यासाठी पुलाचे बांधकाम करण्याकरिता खाजण जमिनीतील कांदळवनाची केलेली अवैध तोड" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.हरसिंग राठोड यांनी "राज्यातील वनविकास महामंडळाच्या बारमाही रोजंदारी वन मजुरांना सेवेत कायम करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी "कार्ला, लोणावळा (ता.मावळ, जि.पुणे) येथील पांडव कालीन श्री एकविरा देवीचे मंदिर अनधिकृत ठरविल्यामुळे भाविकांच्या भावना दुखावल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सदस्य हातात फलक घेऊन माननीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनासमोर घोषणा देतच असतात.)

सचिव....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी "बीड जिल्हा परिषदेच्या शाळांच्या इमारतीतील खोल्या धोकादायक झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या जीवितास निर्माण झालेला धोका" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

**दिनांक 11 डिसेंबर, 2015 रोजीच्या सूचना :-**

सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी "राज्यातील अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय बिलांची प्रतिपूर्ती नाकारली जाणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी "वैजापूर (जि.औरंगाबाद) येथील श्रीरामकृष्ण गोदावरी सहकारी उपसा जलसिंचन योजना बंद पडल्यामुळे 50 गावांचा पिण्याचा पाण्याचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी "भिवंडी (जि.ठाणे) येथून वर्तकनगर येथील रुग्णालयात जात असताना रुग्णवाहिकेमधील ऑक्सिजन सिलेंडरचा स्फोट होऊन एक दिवसाच्या बालकाचा झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "राज्यातील बिगर आदिवासी क्षेत्रातील उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांना वेतन अनुदान मंजूर करण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

..7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सचिव....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी "शिक्षण संस्थेतील शिक्षक चालकांचे मूलभूत अधिकार कमी करणे, शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा बोजा वाढविणे, अनुदानपात्र शाळांना अनुदान न देणे, दि.01 नोव्हेंबर, 2005 नंतर सेवेत रूजू झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.आनंदराव पाटील यांनी "मौजे गोटे (ता.कराड, जि.सातारा) येथील नागरिकांना वितरीत करण्यात आलेले शासकीय प्लॉट त्यांच्या नावे करण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

(विरोधी पक्षाचे काही सदस्य हातात फलक घेऊन माननीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनासमोर घोषणा देतच असतात.)

**सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक सोमवार, दिनांक 14 डिसेंबर, 2015 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 52 मिनिटांनी सोमवार, दिनांक 14 डिसेंबर, 2015 रोजीच्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही